म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का-का
दा. क्र. २६९८

२६९८
२६९८

# लिंबोणीच्या झाडाखाली

IRBK-0102618
IRBK-0102618

गोपीनाथ तळवलकर

म. ग्रं. सं. ठाणे
बालवाङ्मय
नं. ५९२

# लिंबोणीच्या झाडाखाली



गोपीनाथ तळवलकर

...कार्यालय

दां. क्र. २६९

# लिंबोणीच्या झाडाखालीं

अनुक्रमांक ८५८७
विभाग ३।१।५४
क्रमांक
नों. दि.
श्री नाट्य शाखा

लेखक
गोपीनाथ तळवलकर

२६९
IRBK-0102618
IRBK-0102618

१९४७

किंमत १२ आणे

प्रकाशक
वि. ह. दामले
नवीन किताबखाना
६२७ बुधवार, पुणें २.

मुद्रक
मो. ब. जोशी
आनंद मुद्रणालय
१९६/४६ सदाशिव, पुणें

सर्व हक्क
आनंद कार्यालय
३३० सदाशिव, पुणें
यांचेकडे स्वाधीन

चित्रकार
मुळगांवकर

# दोन शब्द

या पुस्तकांतल्या गोष्टी 'आनंदां'त वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत. या गोष्टी शाळांतून व्याख्यानास गेलों असतां किंवा सेवादलांत अभ्यास-मंडळें घेतांना मी बालगोपालांना सांगितल्या आहेत. प्रत्यक्ष लिहिण्यापूर्वी हे कथानिवेदनाचे प्रयोग केलेले असल्यानें बालगोपालांच्या रसग्रहणाचा व मार्मिक प्रश्नांचा फायदा या कथा-रचनेस मिळाला आहे. तेव्हां त्या सर्वांचे आभार जरूर मानले पाहिजेत.

एकादी गोष्ट सांगितल्यानंतर तीवर मुलांचीं मतें अजमावणें हें मोठें मनोरंजक कार्य असतें. स्वभावभेदास अनुसरून मुलें वेगवेगळीं मतें प्रकट करतात. कित्येकदां प्रौढ मंडळीस सुचणार नाहींत असे प्रश्न किंवा कल्पना त्यांच्या तल्लख मेंदूतून निघतात. अशा वेळीं आपण मुलांना शिकविण्यास जावें तों आपणच कांहीं नवें शिकत आहोंत असा प्रत्यय येतो. प्रस्तुत लहानशा पुस्तकांत या प्रत्ययाची नोंद झालेली दिसेल.

नुसती गोष्ट सांगून टाकणें हा अगदीं स्थूल प्रकार झाला. पण मनो-रंजनाबरोबरच मुलांची तर्कशक्ति, कल्पकता वाढविणें व उच्च जीवन-मूल्यांची ओळख त्यांना करून देणें हेंहि अवश्य झालें पाहिजे. या दृष्टीनें या पुस्तकांतील कथांतून प्रयत्न केलेला आढळेल. कांहीं प्रसिद्ध कथा नव्या पद्धतीनें आशय व शेवट बदलून सांगितल्या आहेत. मुलांकडून गोष्टीचें तात्पर्य वदवून घेण्याचा उपक्रम केला आहे. गोष्टींतील रहस्य मुलामुलींनीं चर्चा करून जाणून कसें घ्यावें हें दाखविलें आहे. सध्याच्या क्रांतिकारक कालांतील एकादी महत्त्वाची घटना मुलांना रूपककथेच्याद्वारें समजावून दिली आहे. अशा निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करून मुलांच्या कल्पना–चिकित्सा–शक्ती संवर्धित करण्याची योजना ह्या कथांत दिसेल.

ही योजना किती यशस्वी होते हें शिक्षक, पालक व बालवाचक ठरवतीलच. बालवाङ्मयांतल्या कथाविभागांत या तऱ्हेचें हें पुस्तक पहिलेंच आहे असें नम्रतापूर्वक सांगावेसें वाटतें. यांतील गोष्टींच्या एक एक नमुन्यास धरून अगणित कथा सांगतां येतील. शिक्षण व मनोरंजन या दोनही दृष्टींनीं हें पुस्तक सर्वांना आवडो ही इच्छा.

२-९-४७
गांधीजयंती, पुणें

गोपीनाथ तळवलकर

★

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषयाचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | स्वर्गाच्या दारांत | १ |
| २ | निर्दोष गुन्हेगार | ६ |
| ३ | शनीची करामत | १२ |
| ४ | पर्वताची उपासमार | १५ |
| ५ | शहाणपण सुचलें पण केव्हां ! | १९ |
| ६ | संघटनेचें बळ | २३ |
| ७ | जुन्या गोष्टीचा नवा अवतार | २७ |
| ८ | अज्ञान संपलें, भय गेलें | ३२ |


★

नाना मध्यभागीं बसले.

ते सांगू लागले, " आज मी तुम्हांला धर्मराजाची गोष्ट सांगणार आहे. पांडवांनीं कौरवांना ठार केलें आणि हस्तिनापुरचं आपलं राज्य घेतलं. लोकांत उत्तम राज्यकर्ते म्हणून त्यांनीं नांव कमाविलं. चोंहींकडे शांतता स्थापन केली, संपत्ति खूप वाढविली. आणि अखेर आपला अवतार संपवून स्वर्गात जायला ते निघाले.

" पण सर्व कांहीं स्वर्गापर्यंत पोचले नाहींत. भीम खादाड फार होता, त्यानें आपण आपण खायचं आणि दुसऱ्याला द्यायचं नाहीं असं केलं म्हणून तो पडला. अर्जुनानं शंभर कौरव मारण्याची केलेली प्रतिज्ञा पुरी केली नाहीं म्हणून तो मरून पडला. नकुळाला सौंदर्याचा गर्व फार, तो कोसळला. सहदेवाला शहाणपणाचा फाजिल अभिमान, तोहि खालीं आला. द्रौपदीहि पडली. बालमित्रांनो ! स्वर्ग मिळण्याच्या आड कोणकोणत्या गोष्टी येतात हें पहा बरें !

" पण मला मुख्य तें नाहीं सांगायचं. शेवटपर्यंत टिकले काय ते धर्मराज. त्यांचें वर्तन स्वच्छ होतें. गर्व, द्वेष, व्यसनं यांचा स्पर्श नव्हता झाला त्यांना. त्यांच्याबरोबर एक कुत्रा काय तो राहिला.

" स्वर्गाच्या दारांत येतांच सर्वांनीं त्यांचें स्वागत केलें. फार आनंद झालेला दिसला सर्वांना. इतक्यांत एक देव हळूच म्हणाला, ' धर्मराज, स्वर्गात यावं. आंत दरबारामध्यें इंद्र आपली वाट पहात आहेत. पण कृपा करून हें श्वान मात्र आंत आणूं नका !' धर्मराजांनीं शांतपणें सांगितलें, ' या श्वानास घेतल्याखेरीज मी स्वर्गात प्रवेश करणार नाहीं. या मुक्या प्राण्यानं माझी एथवर सोबत केली. माझ्या

बरोबर संकटें सोसलीं. माझ्या भोवतीं रात्रीं पहारा केला. आतां मी एकटाच याला सोडून आंत कसा जाऊं ?' दारावरचे देव धर्मराजाची समजूत घालूं लागले. पण धर्मराज ऐकेना. त्यांनीं स्पष्ट सांगितलें, 'या कुत्र्याला घेऊन आंत यायला मिळत नसेल तर स्वर्ग नको मला. हा मी निघालों परत.' हे निर्धाराचे शब्द धर्मराजानें उच्चारले असतील नसतील तोंच तो कुत्रा नाहींसा झाला. त्या जागीं यमधर्म दिसूं लागला. तो धर्मराजांना म्हणाला, 'शाबास, धन्य आहे तुझी. स्वर्गसुखासाठींसुद्धां तूं एका साध्या मुक्या प्राण्याला दूर करण्यास तयार झाला नाहींस. धर्मराजा, मीच तुझी कसोटी पाहण्याकरितां हें कुत्र्याचें रूप घेतलें होतें.' देवानीं मग धर्मराजांना सन्मानपूर्वक इंद्रसभेंत नेलें."

एवढी गोष्ट सांगून नाना म्हणाले, "सत्व म्हणतात तें हेंच. या ठिकाणीं कुत्रा हें केवळ सत्वाचें चिन्ह आहे. प्रतापसिंह, संभाजी यांच्यासारख्यांनीं सत्वाकरितां वनवास सोसला. प्राण दिले. कुणी देशभक्त एकादी राजकीय मागणी पुरी होत नाहीं म्हणून सुखावर लाथ मारील. आपल्या सत्वाचा मोबदला देऊन सुख विकत घ्यायचें हा अधमपणा होय."

गोष्ट संपली. तात्पर्य कळलें.

शांता आपल्या मृदु स्वरांत म्हणाली, "स्वर्गांत मोठ्या देवाची भेट घेणं हें कुत्र्यापेक्षां जास्त नाहीं कां ? धर्मराजानं देवाची किंमत कुत्र्यापेक्षां कमी नाहीं कां ठरविली ?"

नाना म्हणाले, "शांता, श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण याचा वाद

इथें नव्हता. आपण ज्याला आश्रय दिला त्याला आपल्याला चांगले दिवस येतांच दूर करावा कीं काय ही कसोटी होती. एकादा सिनेमा पाहायाची संधि आली तर आपल्या जिवलग मित्राला आपण सहज सोडून देतों. इथें स्वर्गाची प्राप्ति होत होती तर आपल्या कुत्र्याकरितां ती धर्मराजानं नाकारली. आणि तुला सांगतो कीं कुत्रा सोडून धर्मराज देवाकडे गेला असता तर तो देवाला तरी आवडला असता काय ? ”

“ पण तो कुत्रा देवच होता कीं ! धर्मराजांनीं एकापरीनें देवालाच खुप केलं. ” कापिंजल म्हणाला.

“ अरे वेड्या, धर्मराजाला हें पहिल्यानें माहीत होतं का ? तो खरोखरीचा कुत्राच त्याला वाटत होता. म्हणजे धर्मराजाचा त्याग खराच फार मोठा होता. ”

“ हास्तिनापुरांतले चार पापी लोक युधिष्ठिराबरोबर असते तर त्यांनाहि युधिष्ठिरानें आंत नेलें असतें का ? ” लक्ष्मणानें विचारलें.

“ अर्थात् ” नानांनीं ठासून सांगितलें. पण लगेच हंसून म्हणाले, “ पण भीम, अर्जुन यांसारखे शीलवान लोक ज्या अर्थी मध्येंच पडले त्या अर्थीं हे पापी लोक येथवर पोचले तरी कसे असते ? म्हणजे हा प्रश्नच युधिष्ठिरापुढें उपस्थित झाला नसता. ” पद्मा:— “ कुत्रा तेथवर आला म्हणून तो स्वर्गाला लायक आहे असें युधिष्ठिराला वाटलें असेल. ” नानांनीं उत्तर दिलें, “ मला ही गोष्ट नाहीं शक्य वाटत. लायक माणसाला न सोडणं यांत मोठेपणा तो कोणता ? युधिष्ठिरानें कुत्र्याची लायकी पाहिली नाहीं. त्याचं प्रेम

पहिलं. प्रेम हीच लायकी असं संत मानतात. धर्मराज मोठे संत होते. शिवाय महाभारतकाराला असेंहि सुचवायचें असेल कीं, माणसापेक्षांहि जनावर कित्येकदां नम्र व निष्पाप असूं शकतें. तेव्हां माणसांनीं आपल्या गुणाचा उगाच गर्व करूं नये."

नंतर कोणी कांहीं विचारलें नाहीं.

राष्ट्रगीत झालें, आणि मंडळी घरोघर गेली.

★



संध्याकाळ झाली. लिंबोणीच्या झाडाखालीं मुलें जमूं लागलीं. कवाईत करून आणि खेळून तीं दमलीं होतीं. पण खूप आनंदहि दिसत होता त्यांच्या चेहऱ्यावर. आजपासून नाना दररोज नवी गोष्ट सांगणार होते. पण नुसती काऊचिऊची नव्हे, आणि नुसत्या करमणुकीसाठीं तर नव्हेच. नानांनीं सांगितलें होतें कीं, ‘ मी गोष्ट लहानशीच सांगेन. पण तुम्ही तीं नुसती ऐकून घेऊं नका. त्यावर शंका विचारा, कांहीं भाग कळला नाहीं तर समजून घ्या. आणि गोष्टीच्या तात्पर्याचें नीट मनन करा. ’ ‘ ठीक ठीक,’ सर्वांनीं कबूल केलें होतें.

शांता, पद्मा, इंदु, लक्ष्मण, कपिंजल, दिलीप, किसन, सर्व मंडलाकार बसले. आपले अनवरमिया गांधीटोपी जरा ऐटींत कलती ठेऊन एके बाजूस बसले. रेखा दासगुप्त बंगाली. पण ती मराठी उत्तम जाणायची. सुब्बालक्ष्मीहि होती. छोटा कपूर लाहोरचा होता. आणि आमचे गुटगुटीत नटवरलाल हे गुजराथी आहेत हें न सांगतांहि कळलें असतें.

साडेसहाला नाना आले. त्यांना तो देखावा फार रमणीय वाटला. लिंबोणीच्या झाडांतून बीजेची कोर दिसत होती. त्या मुलांमुलीसारखीच लहान आणि सुंदर. तो मेळावा आपल्या प्रिय भारताचा लहानसा फोटोच वाटला नानांना.



# निर्दोष गुन्हेगार

आज सायंकाळीं मुलें जमल्यावर मानांनीं म्हटलें, “ आज मी जी गोष्ट तुम्हांला सांगणार आहे ती अगदीं साध्या माणसाच्या जीवनांतली आहे. तो कुणी ऋषि-मुनि नाहीं, पंडित नाहीं, राजा नाहीं, किंवा महाकवि नाहीं. एक मामुली माणूस. पण त्याच्या जीवनांतल्या एका प्रसंगावर किती आपणांला विचार करतां येईल तें पहा तुम्ही. ”

“ सांगा, सांगा. ” सर्वजण म्हणाले.

“ युरोपांतली गोष्ट. एकदां एका श्रीमंत माणसानें आपल्या स्नेही-सोबत्यांना मेजवानीस बोलाविलें. सर्वजण जमले. बेत अगदीं उंची. पक्वान्नें, मिठाई, फळफळावळ, दारू, कांहीं विचारूं नका ! हास्यविनोद चालला होता. एक धनिक डॉक्टर हातांतल्या हिऱ्याच्या अंगठीशीं चाळा करीत होता. तो अंगठी बोटांतून काढी आणि पुन: घाली. कधीं उंच सागरगोट्यासारखी झेलत बसे. या चाळ्यांत ती अंगठी टेबलावर पडली आणि तिथून टप्पा घेऊन कुठं अडगळींत गेली कुणाला ठाऊक ! अंगठी चांगली हजार दीड हजार रूपये

किंमतीची तरी असेल. शोधाशोध सुरू झाली. कुणी टेबलावरचें कापड काढून पाहूं लागला, तर कुणी जमिनीवरील गालिचा उचलून शोधूं लागला, कुणी जवळच्या कपाटामागें धुंडायला गेला. पण व्यर्थ!

" मग त्या श्रीमंत यजमानाला एक कल्पना सुचली. तो म्हणाला, 'कदाचित् कुणाच्या खिशांत डॉक्टरांची अंगठी गेली असेल!"

" वा: खिशांत कशी जाईल?" गोष्ट ऐकण्यांत रंगलेल्या बाळगोपाळ मंडळींतून कुणी बोललें.

" ऐक रे, तुझ्या शंका मग." इतरांनीं त्याला गप्प बसविलें.

नाना हंसून म्हणाले " खिशांत जाण्याचा संभव थोडा खरा. पण न जाणो कुणाच्या अघळपघळ कोटाचा बाहेरचा खिसा 'आऽ' वासून बसला असला तर त्यांत पडलेली असायची. रोग अगदीं बरा न होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं म्हणजे माणूस हवा तो उपाय करून पाहतो. एकादी मौल्यवान् वस्तु हरवली म्हणजे असेंच नाहीं का होत? नाहीं तिथें शोध करावा असं माणसाला वाटूं लागतं. बरं तें राहो. काय सांगत होतों?"

" यजमान म्हणाला, 'कुणाच्या खिशांत कदाचित् पडली असेल" कपिंजलनें नानांच्या गोष्टीचें सूत्र जुळवून दिलें.

" बरोबर. असं यजमानानं म्हणतांच प्रत्येकानं आपापल्या अंगांतले कोट काढून बाहेरचे खिसे तपासले. डॉक्टरनं सुद्धां आपले खिसे तपासले. पण अंगठी कांहीं सांपडली नाहीं. यजमानाचा एक

मित्र बाजूला होता. तो मात्र कांहीं कोट काढून अंगठी शोधीना. स्वस्थ बसून राहिला होता तो. इतरांचें लक्ष त्याच्याकडे गेलें तेव्हां त्यांनीं त्याला सांगितलें. 'कोट काढा ना तुमचा.' पण त्यानें तसें करण्याचें साफ नाकारलें. सर्वांना संशय आला. त्या माणसाचे मळके कपडे, त्याची हाडकुळी शरीरयष्टि, त्याचे खोल गेलेले डोळे हें सर्व पाहिलें म्हणजे तो दरिद्री आहे याची खात्री पटत होती. आणि त्यामुळें तर संशय अधिक बळकट होत होता. यजमानाचा जुना दोस्त म्हणून तो त्या श्रीमंतांच्या मेळ्यांत येऊं शकला होता. पण त्यांच्यांत त्याला पूर्णपणें मिसळतां आलें नव्हतें. त्याचा दरिद्री वेष, क्षीण मुद्रा, आणि बुजरं वागणं पाहून सर्वजण पहिल्यापासूनच त्याच्याकडे जरा तुच्छतेनं पहात होते. आणि नंतर तो कोट काढण्याचें नाकारूं लागला तेव्हां तर त्याच्याबद्दलचा तिरस्कार कळसास पोचला. खास याच भणंगानें अंगठी चोरली असली पाहिजे. डॉक्टर महाशय तर त्याला पोलिसाच्या स्वाधीन करायला निघाले. पण यजमान मध्यें पडला. अंगठी त्या माणसानें चोरली असेल तर आपण त्याच्याकडून ती सामोपचारानें परत मिळवून देऊं असें त्यानें डॉक्टरला आश्वासन दिलें. तेथें तंटा मिटला.

"या गोष्टीला बरींच वर्षें लोटलीं. डॉक्टरांचा धंदा खूप जोरांत सुरू होता. एक दिवस एका खेडेगांवांत डॉक्टर गेले. तेथें एका धर्मार्थ दवाखान्याला भेट द्यावयाची होती त्यांना. डॉक्टर दवाखाना पहात असतां एका वृद्ध मरणोन्मुख रोग्याच्या पलंगापाशीं ते आले. रोग्याचा मरणकाल समीप आला होता. त्याला स्पष्ट दिसत

नव्हतें. डॉक्टर त्याच्याजवळ जातांच तो रोगी क्षीण स्वरांत म्हणाला, 'डॉक्टर साहेब, मीं अत्यंत दारिद्र्यांत आणि कष्टांत आयुष्य काढलें. पण नेकी सोडली नाहीं, कुणाचं नुकसानं केलं नाहीं. एकच कलंक मला लागला. एका श्रीमंताच्या घरीं मेजवानींच्या वेळीं अंगठी हरवली ती मीं चोरली असा माझ्यावर आळ आला होता.' आतां या रोग्याची ओळख डॉक्टरांना पटली, पण ते कांहीं न बोलतां रोग्याची कहाणी ऐकूं लागले. मेजवानीच्या वेळीं घडलेली सर्व हकीकत ऐकून झाल्यावर अधीरपणें डॉक्टर म्हणाले, 'पण तूं कोटाचे खिसे त्या लोकांना कां नाहीं पाहूं दिले?' 'डॉक्टर, काय सांगूं? तेथील बदाम, पिस्ते, मिठाई, फळें मी फारशीं न खातां माझ्या खिशांत भरलीं होतीं. माझी एकुलती एक पोरगी घरीं होती. मी साताजन्मांचा दरिद्री! तिला असले उंची पदार्थ कसे देऊं शकणार? पण तिला टाकून माझ्यानं ते कांहीं खाववेनात. म्हणून तिच्यासाठीं मीं ते खिशांत भरले होते. खिसे तपासले असते तर माझें हें करणं उघडकीस येईल, म्हणून मी खिसे तपासूं देण्याचें नाकारलें. पण त्यामुळं अंगठी मींच ठेवली असें सर्वांना वाटलें. व मी चोर ठरलों. मी त्या गांवांतून काळं केलं आणि इथं आपलं कलंकित तोंड लपवून राहिलों. पण तो कलंक कांहीं मला पुसून काढतां आला नाहीं. अरेरे, मी आतां असाच पापी म्हणून प्रसिद्ध राहून मरणार...' त्याला मध्येंच अडवून डॉक्टर म्हणाले, 'भल्या माणसा, तूं दोषी नाहींस. त्या श्रीमंत यजमानाच्या नोकराला कांहीं दिवसांनीं ती अंगठी सांपडली आणि सर्व भ्रम दूर झाला. तुझ्याबद्दल

संशय घेतला याचें सर्वांना वाईट वाटलें. सर्वजण तुझी क्षमा मागायला गेले. पण तूं गांव सोडून इकडे निघून आला होतास. ज्याची अंगठी हरवली होती तोच मी डॉक्टर. अन् ही पहा ती अंगटी.' तो वृद्ध रोगी आनंदित झाला, डॉक्टरचा हात छातीवर घेऊन त्यानें प्राण सोडला."

"संपली गोष्ट?"

"हो संपली."

गोष्ट तर सर्वांना फारच आवडली. कोणी कांहीं बोलत नव्हतें. शांताचे डोळे तर पाण्यानें डबडबले. इतक्यांत अनवरमिया म्हणाले, "गोष्ट एकदम पसंत. पण त्या दरिद्री माणसानें फसवणूक केली, हें खरें कीं नाहीं?"

एवढा एकच प्रश्न बहुधा आज येणार असें दिसलें. तेव्हां नानांनीं समारोप केला, "अनवरमिया, तुमचं म्हणणं बरोबर आहे. कांहीं झालं तरी दुसऱ्याच्या मेजवानींतून गुप्त सांठा करून घेणं किंवा अंगठीचा शोध चालला असतां दुसऱ्याला संशय येईल अशी मुग्धता स्वीकारणं ठीक तर नाहींच. पण त्या माणसानं हें कोणत्या भावनेनं केलं याकडे लक्ष द्या. शिवाय असा एक प्रश्न मनाला आपण केला पाहिजे कीं, एका माणसाच्या घरीं वाया जाईल इतके उंची खाद्यपदार्थ, तर एका माणसाला जन्मांत एकदा सुद्धां आपल्या मुलीला गोड खाऊ देण्याची ऐपत नाहीं, अशी विचित्र स्थिति आहे जगांत! अशा वेळीं त्या कंगाल रोग्याच्या हातून अशा विचित्र

गोष्टी न घडल्या तरच नवल! ही देवाची करणी म्हणून स्वस्थ बसणं चूक आहे. आपण जंगलें तोडलीं, धरणें बांधलीं, विजेची शक्ति निर्माण केली, एक ना दोन हजार गोष्टींनीं सृष्टीचें स्वरूप पालटून टाकिलें. मग ज्यायोगें सज्जन पण सायाळू गरिबांना चोरी करावी लागते ती परिस्थिति नाहीं का आपण बदलूं शकणार? खास बदलूं शकूं."

अनुक्रम
विभाग
नों. दि.



# शनीची करामत

आज मुलें जमल्यानंतर नाना म्हणाले, "आज वार कोणता रे ?"

" शनिवार " सर्वांनीं उत्तर दिलें.

" शनिवार कोणाचा वार ? "

" शनीचा. "

" बरोबर. शनीबद्दल काय माहिती आहे ? "

" त्याच्याभोंवतीं रंगीबेरंगी सुंदर कडीं असतात. " शांता म्हणाली.

" ठीक. तुझ्यासारख्या मुलीला पहिल्यानें दागिनेच आठवायचे." नाना हसून म्हणाले, "पण शांता, तुझें उत्तर बरोबर आहे. आणखी कांहीं माहिती ? "

" शनी पापग्रह आहे. तो ज्याच्या राशीला जाईल त्याचा सत्यनाश करतो. शनीची साडेसाती फार तापदायक असते. " किसननें सांगितलें.

" बरोबर आहे. त्यावरच आज मीं एक गोष्ट सांगणार आहे. कदाचित् कांहीं लोकांना तीं ठाऊकही असेल. काय झालं एकदां ? शनि शंकराकडे गेला. आणि हट्ट धरून बसला कीं, ' मी तुमच्या राशीला येतों. ' शंकर म्हणाले, ' कशाला तुझी पीडा मला ? '

शनि म्हणाला, ‘ देवा, तुम्हांला फार नाहीं त्रास देणार. एक प्रहरभर फक्त तुमच्या राशीला येऊं द्या. माझा प्रभाव पहा तर खरा. ’ ‘ ये बापडा. पण तुझा प्रभाव मात्र पाडतां यायचा नाहीं तुला. ’ शनि छद्मीपणानें हसला आणि अमुक प्रहरीं तुमच्या राशीला येणार असें सांगून गेला. शनीच्या आगमनाचे वेळीं शंकरांनीं समाधि लाविली आणि एक प्रहर संपतांच ती विसर्जन केली. समाधि लाविलेली असल्यामुळें शनि कांहीं करूं शकला नाहीं. असें सांगतात कीं, समाधिकाळीं जीव हा सामान्य शक्तींच्या आटोक्याबाहेर जातो आणि त्यावेळीं त्यावर कुणाचा कांहीं परिणाम होऊं शकत नाहीं. प्रहर संपल्यानंतर शनि भेटायला आला तों शंकर समाधि विसर्जन करून बसले होते. शनि येतांच शंकर त्याला हसून म्हणाले, ‘ काय करूं शकलास तूं माझें वाकडें ? ’ तेव्हां शनि म्हणाला, ‘ महाराज, आपल्यासारख्या सर्वशक्तिमान् परमेश्वराला तीन तासपर्यंत स्वस्थ बसावें लागलें ही माझीच बहादुरी नाहीं का ? ’ ”

नाना थांबले.


“ संपली गोष्ट ? ” मुलांनीं विचारलें.

“ हो. गोष्ट एवढीच. पण यावरून काय उमजलें तुम्हांला ? ”

मुलें एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलीं. कोणास कांहींच सुचेना. मग नानांनींच सांगण्यास सुरवात केली. ते म्हणाले, “ भीतीचा मनुष्यावर काय परिणाम होऊं शकतो हें यावरून तुम्हांला पटेल. शंकरासारखा त्रिभुवनाचा संहार करणारा महाबलाढ्य देव पण तीन तास कांहीं न करतां स्वस्थ बसला. निष्क्रियता ही भीतीच्याच पोटीं

जन्माला येते. निष्क्रियता म्हणजे मरण. 'थांबला तो संपला.' सायकलची गति संपली कीं ती कोलमडून पडते तसें आपल्या जीवनाचें आहे. म्हणून निष्क्रियता आणणारी भीति आपण प्रथम सोडली पाहिजे. आपल्या कामांत घोटाळे होतील, अपयश येईल, आपण बदनाम होऊं अशा अनेक प्रकारच्या भीतीमुळें आपण कार्यच करायला निघत नाहीं. शंकराचें उणेपण दाखविण्याकरतां ही गोष्ट मी सांगितली नाहीं. एवढ्या मोठ्या शक्तिशाली देवालासुद्धां भीति कसें निष्क्रिय बनविते हें मला दाखवावयाचें होतें. आपल्या देशाला अनेक रोग लागले आहेत. त्यांतला पहिल्यानें कोणता हटायला पाहिजे असेल तर तो भीतीचा. ' अभय ' हें व्रत आज आपणांला अत्यंत जरूर आहे. अभयानेंच आपल्या झोपलेल्या अनेक शक्ति जागृत होऊन कामाला लागतील. "

★




नानांनीं गोष्ट सांगण्याच्या पूर्वीच प्रस्तावना केली; " बरं का रे, आज जी गोष्ट सांगणार आहें मी, तीवर वादविवाद कुणालाच करतां येणार नाहीं. अनवरमिया, दिलीप, शांता, नीट लक्षांत ठेवा सारेजण. " यावर अनवरमिया तर कांहींतरी ताडकन् बोलण्याचा प्रयत्न करणार असें दिसूं लागलें. पण दिलीपनें त्यांना डोळ्यानें खुणविलें. वादांत भाग घेणाऱ्या मुलांनीं एकमेकाकडे मिष्किलपणें पाहिलें. जणूं त्यांना असें म्हणावयाचें असावें, " नानांना कांहीं म्हणूं द्या. आपण वाद केल्याशिवाय थोडेच राहणार आहोंत ? "

नाना पुढें सांगूं लागले, "एक पर्वत होता. खूप मोटा होता तो. त्याच्यावरून एके बाजूकडून मध्यावर सूर्य यायला कितीतरी वेळ लागे. दुसऱ्या बाजूला उन्हें पडायला खूप उशीर व्हावयाचा. इकडे दुपारीं तो दुसऱ्या बाजूला कलला कीं पहिल्या बाजूला लौकर सायंकाळ व्हायची. मोठमोठाले मेघ तो ओढून आणायचा. कांहीं मेघ याबाबतींत कुरकूर करीत. कित्येकदां एकादुसरा मेघ विजेचें अस्त्र पर्वतावर सोडून हिंसेचा अवलंब करी. पण तो पर्वत फार सामर्थ्यवान होता. त्याच्यावर या अस्त्रांचा कांहीं परिणाम होत नसे. त्याचा विस्तार

खूप लांब होता. त्याच्यापासून निघालेले चार दोन लहान डोंगर कांहीं मैलावर होते. ते या पर्वताच्या कृपाछत्राखालीं रहात."

पर्वताच्या वर्णनांत मुलें रंगलीं आहेत असें पाहून नानांनीं उत्साहानें पुढें गोष्ट सांगण्यास आरंभ केला. ते म्हणाले "या पर्वताचं असं महात्म्य अनेक शतकं टिकलं. लांबलांबचे लोक त्याच्या आश्रयाला येत. त्यामुळें त्याला गर्व झाला. तो कुणाला जुमानीना. आपण हिमालयालासुद्धां भारी आहोंत, आपण प्रत्यक्ष देवाचेच अवतार आहोंत, असें तो म्हणूं लागला. त्याचा गर्विष्ठपणा त्याच्या पुरताच असता तरीहि हरकत नव्हती. पण त्याचा त्रास इतरांनाहि होऊं लागला. सूर्याच्या किरणांना स्वैर हिंडायला मोकळीक मिळेना. वाऱ्याचें स्वातंत्र्यगीत बंद झालें. मोठाले संपन्न ढग याच्या भीतीनें पांढरे बनून दिगंतराला पळूं लागले! फक्त या पर्वताच्या खुषीवर ज्यांची चैन चालू होती ते वृक्ष, नद्या, प्राणी मात्र या पर्वताला दुवा देत, बाकी सर्व त्याचे वैरी झाले होते. जो तो मनांतून भयंकर संतापला होता. पण प्रचंड पर्वतापुढें कोणाचं काय चालणार?

"पण त्याच्या गर्विष्ठपणाचा ताप सर्वांनाच जेव्हां असह्य होऊं लागला तेव्हां सर्वांनीं त्याला विरोध करण्याचा चंग बांधला. मेघ, वारा, सूर्य या सर्व शक्ति एकत्र झाल्या. वास्तविक त्यांच्यांत एकमेकांचं तितकसं पटत होतं अशांतला भाग नव्हता. वारा आला कीं मेघाला पळतां भुई थोडी व्हायची. सूर्य आणि वारा यांची श्रेष्ठतेबद्दल चढाओढ लागलेली असायची. सूर्य तर इतक्या लांबून या सर्वांना एका परीनं असह्य व्हायचा. पण त्यांना जेव्हां हें पटलं

कीं आपणांत एकमेकाचे कितीहि मतभेद असले तरी आपणांला एका प्रचंड पर्वताचा गर्व हरण करावयाचा आहे. आपण आपसांत भांडून उपयोगीं नाहीं.

" तेव्हां मग जो तो एकमेकाशीं सहकार्य करूं लागला. सूर्यानें प्रथमं आपली तीव्रता कमी केली. पर्वत म्हणाला, ' एवढा हा प्रतापशाली सूर्य पण घाबरला मला.' पण सूर्याचा डाव त्याला ठाऊक नव्हता. उष्णता कमी झाल्यामुळें पोकळी उत्पन्न झाली नाहीं. अर्थात् वारा तिकडे जाईना आणि वारा तिकडे जाईना म्हणतांच मेघ तरी कसे जाणार? कारण ते तरी वाऱ्याबरोबर जाणार ना? मेघ जाईनात मग पर्वत काय धावून त्यांना घेऊन येणार? शक्यच नाहीं. त्याला कुठें हलतां येत होतें?

" अशा रीतीनें त्याला पाणी मिळेनासं झालं. त्याबरोबर त्या पर्वतावरून निघणाऱ्या नद्या कोरड्या पडल्या! त्याच्या विशाल शरीरावर वाढलेले हिरवेगार वृक्ष शुष्क होऊन गेले. त्याची समृद्धि अशा रीतीनें हळूं हळूं पार नाहींशी होत गेली आणि मग तो लोकांना पूर्वींइतका श्रेष्ठ वाटेना. औषधी शोधायला येणारे संशोधक, लाकडें काढायला येणारे ठेकेदार, हवा खायला येणारे श्रीमंत, इतकेंच काय पण नद्यांच्या उगमांना पवित्र क्षेत्रें समजून पापक्षालनासाठीं येणारे भाविक यात्रेकरू या पर्वताकडे फिरकेनासे झाले! एक उघडा-बोडका, संपत्तिशून्य, प्रचंड ढीग एवढेंच क्षुल्लक स्वरूप त्याचें उरलें. ही आपली दुर्दशा त्याच्या लक्षांत आल्यानंतर वारा, मेघ व सूर्य यांच्याशीं त्यानें हळूं हळूं तहाचें बोलणें लावलें. आणि अशा रीतीनें

त्या पर्वताला आपल्या गर्वाला अखेर सोडचिठ्ठी द्यावी लागली. ”

“ संपली गोष्ट ? ” नाना थांबतांच पद्मानें विचारलें.

“ संपली. ” खरोखर वादासारखें त्यांत कांहींच नव्हतें.

कांहीं वेळ कुणीच बोललें नाहीं. पण मग हळूंच शांता म्हणाली, “ नाना, एक पर्वत गर्विष्ठ होता. त्याची रग इतरांनीं जिरविली एवढेंच. यावरून बोध काय घ्यायचा ? ”

नाना हंसून म्हणाले, “ घ्यायचा झाला तर जरूर बोध घेतां येईल. माणसाला जो मान जग स्वतःला देतें असें वाटत असतें तो वास्तविक त्याच्या गुणांना व संपत्तीला असतो. ते गुण व संपत्ति नाहींशी झालीं कीं त्याच्याकडे कुणी पहात नाहीं आणि त्याची गुणसंपत्तीही त्याला केवळ स्वतःच्या जिवावर मिळवितां येत नाहीं; तर त्यासाठीं त्याला दुसऱ्याचें सहकार्य लागतें. हा सर्व विचार पटला म्हणजे फुकट गर्वाला जागा राहणार नाहीं. शिवाय एखाद्या बलिष्ठ शक्तीला वठणीवर आणण्याचें नवें तंत्र या गोष्टीवरून लक्षांत नाहीं का येत ? ”

मग मात्र मुलें कांहीं नवें समजल्यासारखीं एकमेकांकडे पाहूं लागलीं. सर्वांनीं उच्च रवानें घोषणा केली ‘ वंदे मातरम् ’ ‘ जयहिंद.’

★



# शहाणपण सुचलें पण केव्हां?

आज अगोदर नाना तत्त्वविवेचनच करूं लागले.

'सर्वनाश व्हायची वेळ आली कीं शहाणे लोक अर्धें सोडून देतात' अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. तसेंच आपल्या नाशाचा प्रसंग आला म्हणजे दुसऱ्याचा नाश करण्याची योजना दुष्ट लोक सोडून देतात असें नाहीं का अनुभवाला येत? नंतर ते म्हणाले "या संबंधींची गोष्टच ऐका."

'एक होता डोंगर. फार मोठा नाहीं. टेकाडच होतं म्हणाना! त्याच्यासमोर एक किल्ला होता. किल्ला चांगला बांधून काढलेला. मोठा डौलदार दिसे.

"किल्ल्याच्या वैभवामुळें त्याची कीर्ति खूप पसरली होता. त्या देशाचे राजे तिथं मधून मधून राहायला येत. सम्राट्—महाराजांना तिथं पाहुणचाराला बोलावीत. परदेशचे प्रवासीसुद्धां तो किल्ला पहायला येत. त्याचीं वर्णन लिहून काढीत. चित्रं काढून घेत. थोडक्यांत म्हणजे तो किल्ला चोहींकडे फार गाजून राहिला होता.

"किल्ल्याच्या या नावलौकिकाचं त्या टेकाडवजा डोंगराला फार वैषम्य वाटे. तो मनांत म्हणे, 'मी एवढा डोंगर, हिमालयाचा पणतु, विंध्याचलाचा नातु, लालबुंद अंगकांतीचा, भव्य उंचीचा

आणि हा दगडावर दगड रचून केलेला किल्ला इतका प्रख्यात कसा ?'
डोंगराला खूप राग येई पण करतो काय ? सूर्याला किल्ल्यावर सोनेरी किरणांचा सडा घालण्यास तो प्रतिबंध करूं शकत नव्हता, अथवा पावसानं आपणावर अभिषेक करावा व किल्ल्याला तसाच कोरडा राहूं द्यावा अशी व्यवस्था कांहीं त्याला करतां येणें शक्य नव्हतें. आणि माणसं तर त्याच्याकडे पाह्यलासुद्धां तयार नव्हतीं. मग किल्ल्याच्या दारांतून तो त्यांना आपल्याकडे कसा आणूं शकला असता ?

" डोंगराच्या शेजारीं एक पिंपळ होता. त्याला डोंगराची ही मनोव्यथा कळली. तो एक दिवस डोंगराला म्हणाला, ' गिरिराज, तुमच्या मनचं दुःख मला पूर्ण उमगलं आहे. ह्या मिरमुटल्या किल्ल्याची वाढती मिजास खरोखर कीड आणण्यासारखी आहे. अहो ! मी एवढा जुनापुराणा पिंपळ, माझं नको का लोकांनीं भजनपूजन करायला ? मी तर देवाचा अवतार ! पण व्यर्थ. सर्व लोक आपले या किल्ल्याकडे धांवतात ! पण पिंपळाच्या अंगांत आग असते हें ठाऊकच आहे तुम्हांला. मी अशी या धूडाची दुर्दशा करतों ! पण तुमची आज्ञा पाहिजे.'

' वा: वा: ! मी कां तुझ्याबाहेर आहे ?' डोंगर उल्हसित होऊन म्हणाला, ' पण कायरे ! तूं करणार कसं हें काम ? तूं त्या किल्ल्याला धक्का लावणार असं दिसलं कीं माणसं तुला तुझ्या फांद्यांसकट खालीं आणतील. याची कल्पना आहे ना तुला ?'

' तर ! पण त्या मट्ठ माणसांच्या लक्षांत येणार नाहीं असंच

काम मुळीं करणार आहे मी. माझं सर्व काम गुपचूप. भूमिगत का काय म्हणतात तसं. मी माझे सगेसोयरे तुमच्या या पायथ्यापासून किल्ल्याच्या तटापर्यंत पसरणार. हळूहळू मुळें भूमींतून तटांत शिरूं लागतील आणि तटाचा एक एक दगड निराधार होत खालीं येईल. मग या भग्नशरीर किल्ल्याचें कोडकौतुक कुठवर माणसें करतात तें दिसेलच ! '

" पिंपळानें सांगितल्याप्रमाणें केलें. हळूहळू त्यानें कामास सुरुवात केली. जिकडे तिकडे पिंपळाचे भाईबंद संचार करूं लागले. पण त्यांना एकाच बाजूला वाढूं देणें हें थोडंच पिंपळाला करतां येण्यासारखं होतं ? त्यांची चौफेर वाढ होऊं लागली. त्या डोंगराच्या पायांतहि पिंपळाच्या गनिमीकाव्याचे शिपाई शिरले.

" डोंगराचे मित्र म्हणून कांहीं विश्वासू उंदीर होते. पिंपळाचा पसारा वाढत चाललेला पाहून त्या उंदरांचा पुढारी डोंगराकडे आला आणि म्हणाला, ' या पिंपळाचीं मुळं टाकूं का कुरतडून ? ' हे उंदीर डोंगराच्या आश्रयाला रहात असल्यामुळें त्यांना डोंगराबद्दल आदर वाटे. पिंपळाचा वाढता पसारा आतां आहाराबाहेर चालला आहे हें त्यांना दिसत होतें. पण काय करणार ? डोंगरानें हुकूम दिल्याशिवाय कांहीं करायचें नाहीं असें त्या उंदरांचें व्रत होतें. पण डोंगर कसला ? समोर किल्ल्याच्या तटाला भेगा पाहून त्याला आसुरी आनंद होत होता. हा किल्ला असाच खिळखिळा होत एकदां जमीनदोस्त होईल. आणि मग आपण काय ते सर्वश्रेष्ठ राहूं असें त्याला गोड स्वप्न पडत होतें.

"पण पिंपळाच्या मुळ्या जशा किल्ल्यांत घुसल्या त्याप्रमाणें इकडे डोंगरांतहि घुसल्या. तें आधीं होतं लहानसं टेकाड ! त्यांतून पाया ठिसूळ करणाऱ्या त्या मुळांनीं त्यालाहि चांगलाच तडाखा बसत चालला होता. आज ही दरड खचली, उद्यां तो पाषाण खालीं आला असें होऊं लागलें !

" आतां डोंगराचं धाबं दणाणलं !


" किल्ला खालीं यावा म्हणून उठविलेलें पिंपळाचें भूत आपणासहि त्याच पद्धतीनें खालीं आणील असें त्याला स्वच्छ दिसूं लागलें. किल्ला कदाचित् उद्यां पडेल, पण त्या सुमारास आपलीहि गच्छन्ती होणार हें भविष्य त्याला दिसलें.

"आणि मग उंदराच्या पुढाऱ्यास बोलावून डोंगर म्हणाला ' बाबा रे ! या पिंपळाचीं मुळें तोडून टाक लौकर. आतां माझ्यावर त्याचे प्रहार होऊं लागले आहेत. हीं मुळें तोडण्यासाठीं किल्ल्यांत शिरलेलीं मुळें तोडायचीं असतील तरी चालेल. किल्ला राहिला तरी आतां हर-कत नाहीं. पण मी उठविलेला हा समंध आतां मला शांत केला पाहिजे. '

" उंदरांनीं त्याप्रमाणें केलें.

" किल्ल्याकडील डागडुजीची गरजच त्यांना नव्हती. एका तज्ज्ञ माणसानें किल्ल्याला भेगा का पडतात हें पाहिलं आणि लगेच त्याचें कारण हुडकून काढून त्याप्रमाणें व्यवस्था केली. डोंगराच्या हातून किल्ला वाचला खरा; पण केव्हां ? डोंगरावरच स्वतःच्या दुष्टपणाचा प्रयोग उलटण्याची वेळ आली तेव्हां ! "

★




आज आमचा मेळा जमला तेव्हां अगोदर नाना कांहीं गप्पा-गोष्टी करतील आणि मग गोष्ट सांगायला आरंभ करतील असें आम्हांला वाटत होतें. पण तसें कांहीं झालें नाहीं. नानांनीं एकदमच गोष्ट सांगायला सुरवात केली. नाना म्हणाले:—

“मी पुष्कळदां ‘फार वर्षांपूर्वीची गोष्ट’ असा आरंभ करतों नाहीं ? पण आज वेगळीच सुरुवात करणार आहें. कांहीं महिन्यां-पूर्वींची गोष्ट. पुण्याच्या जवळ ८–१० मैलांवर एका कालव्याच्या कांठीं कांहीं खेकडे एकत्र जमले. संध्याकाळची वेळ होती. त्यांचा नेमच असे कीं दिवसभर आपलें भक्ष शोधीत हिंडायचें आणि सायं-काळीं एकत्र जमून सुखदु:खाच्या गोष्टी सांगायच्या. कधीं दुसरे दिवशींच्या योजना आखायच्या; नवे बेत करायचे. आज सर्वजण जमल्यानंतर खेकड्यांचा पुढारी चहूंकडे न्याहळून पाहूं लागला. ‘अरे आज आपली सर्व मंडळी आलेली दिसत नाहींत ! परवां असेंच झालें. मागल्या आठवड्यांत असेंच झालें. झालंय काय या लोकांना ?’ तेव्हां एक खेकडा म्हणाला, ‘साहेब, अलीकडे तीं शहरांतलीं माणसं इथें येतात. त्यांनीं खेकडे नेण्याचा सपाटा चालविला आहे. परवां आपल्या आकडेरावांचीं दोन मुलं नेलीं. मागल्या आठवड्यांत फेंगडेजींची सर्वच मंडळी ते लोक घेऊन गेले....’ तो खेकडा पुढें

आणखी अशाच कांहीं हकीकती सांगणार तों एक म्हातारा खेकडा आणि त्याची वायको रडत रडत आलीं आणि म्हणालीं, ‘ साहेब, आज आमचीं पण पोरं नेलीं. म्हातारपणाचा आधार गेला हो– ’ त्या रडणाऱ्या जोडप्याचें खेकड्यांच्या पुढाऱ्यानें सांत्वन केलें. पण त्याची मुद्रा गंभीर आणि विचारमग्न दिसली. नंतर एकदम स्फूर्ति आल्याप्रमाणें तो बोलूं लागला. ‘ बंधूंनो, आपण यःकश्चित् खेकडे, दुर्बल म्हणून आपणांवर हीं माणसें उठलीं आहेत ! यांना देवानें उत्तमोत्तम जिनसा खाण्यासाठीं दिल्या असून पुनः आमच्या शरीरावर यांचा डोळा आहे. पण आपण संघटित झालों तर आपण यांची फजीती करूं. प्रत्यक्ष या अजस्त्र माणसांवर चालून जाणें आपणांला शक्य नाहीं. पण यांची उपासमार नाहीं का आपणास करतां येणार ? या माणसांतलींच कांहीं चतुर माणसें आपल्या प्रतिपक्षांना वठणीवर आणण्यासाठीं अशा तऱ्हेचा उपाय योजतात. त्यावरून आपण धडा घेऊं—’ पण इतक्यांत आकाशांत विमानांची घरघर सुरू झाली आणि ते खेकडे भिऊन आपआपल्या विळांत जाऊन दडले !

“ पण तो विचार तेथेंच थांबला नाहीं. खेकड्यांच्या पुढाऱ्यानें रातोरात सभा बोलावून काय करायचें तें ठरविलें. दुसरे दिवशीं सकाळपासून ल्हानमोठे अनेक खेकडे कालव्याच्या कांठीं जाऊन उकराउकरी करूं लागले. एका युवक खेकड्याला एक भेग सांपडली होती. तीमध्यें सर्वांनीं आपआपल्या पोलादी नांग्या घालून ती वाढविण्यास सुरुवात केली. दुपारपर्यंत ती भेग चांगली मोठी झाली आणि मग

कालव्याचें पाणी तींत शिरून कालव्याचा ओघ बदलला ! भलत्याच दिशेला पाणी वाहूं लागलें. त्याच कालव्यांतून पुण्यास पाणी येऊन तें सर्व शहरास मिळत असे. कालव्याचा ओघ बदलल्यानें शहराचें पाणी तुटलें ! हाहाकार उडाला ! नळाला पाणी नाहीं ! लोकांच्या तोंडचें पाणी पळालें ! विहिरी होत्या तेथें माणसांची रीघ लागली ! अधिकारी व तज्ञ मंडळी मोटारी घेऊन शोधूं लागलीं. शेवटीं एके ठिकाणीं भगदाड पडलेलें दिसलें. खेकड्यांचा हा पराक्रम ! मोठ्या प्रयासानें व पुष्कळ हाल काढल्यानंतर तें भगदाड दुरुस्त झालें. माणसांना खेकड्यांची दहशत बसली. मोठमोठ्या मराठी-इंग्रजी वर्तमानपत्रांत वर्णनें आलीं कीं, ' खेकड्यांनीं पुण्याचं पाणी तोडलं. ' "

" संपली गोष्ट ? "

" हो ! आतां यावरून काय बोध घ्याल ? "

" लहान प्राण्यांना त्रास देऊं नये. "

" थोडें बरोबर ! "

" अन्यायाचा प्रतिकार कपटानें करण्यास हरकत नाहीं. "

यावर नाना कांहींच बोलले नाहींत. पण शांता मध्येंच म्हणाली, " नाना असें कधींच सांगणार नाहींत. " नानांना शांताच्या त्या बोलण्याचं हसूं आलें, पण त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा उमटल्याशिवाय राहिली नाहीं. शेवटीं नाना म्हणाले, " या गोष्टीचं तात्पर्य फार मोठं आहे. खेकड्यांचा पराक्रम वर्णन करणं एवढाच माझ्या सांगण्याचा उद्देश नाहीं. इंग्रजीमध्यें म्हणतात, ' एखादा किडासुद्धां उलटतो ' ( Even a worm turns ). खेकड्यांनीं पुण्याचें

पाणी बंद केलें ही गोष्ट खरी आहे. त्यावरून माझ्या मनांत एकच सत्य तुमच्या मनावर बिंबवावयाचें आहे. सामुदायिक रीतीनें प्रतिकार करण्याचा निश्चय खेकड्यांसारख्या लहानशा प्राण्यांनीं केला तरी ते केवढा पराक्रम गाजवूं शकले पहा ! मग माणसांनीं आपल्याजवळ साधनं नाहींत म्हणून स्वस्थ बसण्यांत काय पुरुषार्थ आहे ? खेकड्यांच्या गोष्टींत कपटाचरणाचा किंवा हिंसेचा संदेश मी देत नाहीं. शांतानें मधाशीं बरोबर सांगितलें. पण आपल्याविरुद्ध असलेल्या क्रूर शक्ति केवढ्याहि मोठ्या असल्या तरी आपण सामुदायिक प्रतिकारानें त्यांच्या मर्मस्थानावर आघात केल्यानें त्यांना अडचणींत आणूं शकतो, एवढंच इथं दाखवावयाचं आहे. अर्थात् आपण सुसंस्कृत माणसें आहों. तेव्हां आपलें कार्य उघड पाहिजे व आपली संघटना उजळ माथ्यानें झाली पाहिजे. ”

★



# जुन्या गोष्टीचा नवा अवतार

आज सायंकाळीं मुलें जमल्यानंतर नाना आले. येतांना त्यांनीं एक तक्ता आणला होता. झाडाच्या ढोलीवर एका ठिकाणीं चूक ठोकून त्यांनीं तो तक्ता लावला. तें एक चित्र होतें. कावळा झाडाच्या फांदीवर बसला आहे आणि कोल्हा खालून जमिनी-वरून त्याच्याशीं बोलत आहे असें तें चित्र होतें.

अनवरमिया चित्र न्याहाळीत म्हणाले, " नाना, ही तर गोष्ट आम्ही वाचली आहे. "

" अरे, हो हो ! ' खोट्या स्तुतीला भाळूं नका. ' अशा नांवाखालीं आमच्या पुस्तकांत ती आली आहे. "

" मग ही जुनीच गोष्ट सांगणार का आज ? "

मुलें एकामागून एक प्रश्न विचारीत होतीं. शेवटीं नानांनीं बोट वर करून सर्वांना शांत राहण्यास सांगितलें. नंतर ते म्हणाले, " ह्या चित्रांत जो देखावा आहे, ती गोष्ट जवळजवळ सर्वांना माहीत आहे. पण जुने सोन्याचे दागिने मोडून आपण नव्या घाटाचे करतों कीं नाहीं ? जुन्या घरांत डागडुजी करून नवी बांधणी करतों कीं नाहीं ? "

" करतों, करतों. "

" हं, मग या गोष्टीची तशीच पुन: बांधणी करूं या. आज माझें काम फार थोडें. आज गोष्टीचा कार्यक्रम जवळ जवळ तुम्हीच

चालवावा अशी माझी योजना आहे ! आतां या चित्रावरून मूळ गोष्ट कुणीतरी सांगायची. कोण सांगेल ? ”

“ मी. मी. ” म्हणून जो तो पुढें होऊं लागला. शेवटीं नानांनीं सांगितलें कीं, “ सर्वांना कांहीं एकदम गोष्ट सांगतां येणार नाहीं. तेव्हां आतां मी मतें घेतों. ” अखेर शांताला जास्त मतें पडलीं आणि ती आपल्या मधुर आवाजांत गोष्ट सांगूं लागली——

“ एक होता कावळा. त्याला एक मांसाचा तुकडा सांपडला. तो घेऊन कावळा झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. हें एका कोल्ह्यानें पाहिलें. कोल्ह्याच्या तोंडाला पाणी सुटलें. कावळ्याकडून तो तुकडा युक्तीनें काढायचें त्यानें ठरविलें. मग तो झाडाखालीं उभा राहून गोड आवाजांत कावळ्याला म्हणाला, ‘ कावळेदादा, तूं म्हणे गाणं फार चांगलं म्हणतोस ! मी तुझी कीर्ति फार ऐकली आहे. पण मला तें ऐकण्याचा योग आला नाहीं. मला म्हणून दाखव ना एकादं पद. ’ भोळा कावळा या स्तुतीला फसला. गाणें म्हणण्यासाठीं त्यानें तोंड उघडिलें. तों तोंडांतला मांसाचा तुकडा खालीं पडला. तो घेऊन कोल्हा हसत हसत निघून गेला. तात्पर्य, ‘ **खोट्या स्तुतीला कोणी भाळूं नये.** ’ ” शांतानें गोष्ट संपविली.

“ शाबास, शांता ” नाना म्हणाले, “ आतां याच गोष्टीला वेगळें स्वरूप कोण देऊं शकतो ? ”

पांच मिनिटें स्तब्धता होती.

नंतर दिलीप म्हणाला, “ पहिला कांहीं भाग या गोष्टीसारखाच राहील. ”

" बरं कबूल. "

" पुढें कोल्ह्यानें गाणें ऐकण्याची इच्छा दाखविल्यावर कावळ्याला त्याचा कपटी हेतु तात्काळ कळून चुकला. मग त्यानें तो मांसाचा तुकडा फांदींतल्या खोबणींत ठेवून पायांनीं नीट दाबून धरला आणि तो कोल्ह्याला म्हणाला, ' कोल्होजीबुवा, ऐका आतां माझं गाणं, ' आणि जी कर्कश कावकाव त्यानें सुरू केली ती ऐकून कोल्ह्याचे कान किटले! तो वरमून मनांत म्हणाला, 'मांसाचा तुकडा तर नाहींच, पण या कर्कशरावाची बेसूर बडबड मात्र ऐकून घ्यायला लागते आहे!' 'ठीक, येतों. छान आहे तुझी गाण्याची तयारी!' असें म्हणून कोल्ह्यानें काढता पाय घेतला. कावळ्यानें मग सावकाशपणें आपली न्याहारी संपविली. "

" छान छान. पण तात्पर्य ? "

" **ठकासी व्हावें ठक.** "

" बरोबर. आणखी कोण सांगतो ? "

" मी. !" असें म्हणून पद्मा सांगूं लागली. " पहिला बराच भाग मूळ गोष्टीसारखाच. पण मूळ गोष्टींतलें तात्पर्य मला पटत नाहीं. खोट्या स्तुतीनें कावळ्यासारखे भोळे प्राणी फसतात हें जगांतलें कटु सत्य आहे खरें. पण भोळीं माणसें फसलीं म्हणून लुच्चा लोकांना फुकटचा लाभ व्हावा हा कांहीं न्याय नाहीं. म्हणून मी शेवट असा करीन कीं, मूर्ख कावळ्याच्या तोंडांतून पडलेला तुकडा घेऊन कोल्हा आनंदानें जात असतां वाघ्या कुत्रा ' भो भो ' करीत कुठूनसा आला. त्याचा धिप्पाड देह आणि

मेघगर्जनेसारखा आवाज यामुळें कोल्होबा एकदम दचकले. त्यासरशीं त्यांच्या तोंडांतला तुकडा खालीं पडला. वाघ्यानें झडप घालून तो उचलला आणि चार ढांगांत तो कुठच्या कुठें निघून गेला. कोल्होबांनीं इतक्या धूर्तपणानें मिळविलेली न्याहारी हातोहात गेली. खट्टू होऊन ते पुन: भक्ष्याचा शोध करीत हिंडूं लागले. "

" यावरून काय बोध घ्यायचा ? "

**" जगांत शेराला सव्वाशेर मिळतो. "**

**" अन्यायानें मिळविलेली वस्तु पचत नाहीं. "**

" बरं तसं म्हणा. " पद्मानें उत्तर दिलें.

आतां मूळ गोष्ट बदलून नवी करण्यासाठीं कुणी पुढें येईल असें दिसेना. मग कांहीं जण म्हणूं लागले, " नानांनीं आतां ही गोष्ट नव्या पद्धतीनें सांगावी. "

अखेर हंसत हंसत नाना म्हणाले, " आपल्या दोघा बालमित्रांनीं मूळ गोष्टींत सुंदर फेरफार करून तिचीं नवीं स्वरूपें आपणांला दाखविलीं. याहून वेगळें मी कांहीं करूं शकेन असें मला वाटत नाहीं. पण तुमचा आग्रह म्हणून थोडा प्रयत्न करतों. एका भोळ्या व्यक्तीला त्रास सोसावा लागणें आणि बदमाषांचा फायदा होणें ही स्थिती पद्माप्रमाणें मलाहि अन्यायाची वाटते. पण असें जगांत होतांना तर आपण पाहतों ! मी यावर असें म्हणतों कीं **समाज संघटित असला तर एका भोळ्या व्यक्तीला उपटसुंभ धूर्त फसविणें शक्य नाहीं.** म्हणून मी या गोष्टीची मांडणी कशी करीन पहा. एक कावळा होता. खूप सज्जन पण तितकाच भोळा !

त्याचे जातभाई त्याला सांगत कीं, बाबारे, असं खुळ्यासारखं वागून जगांत चालणार नाहीं. पण त्याचा स्वभाव थोडाच पालटतो आहे? एकदां काय झालें, त्या भोळ्या कावळ्यानें कुठूनसा एक मांसाचा तुकडा मिळविला. तो घेऊन निवांतपणें खाण्यासाठीं तो कावळा एका झाडावर बसला. एका धूर्त कोल्ह्याचें याकडे लक्ष होतें. तो झाडाखालीं आला आणि कावळ्याला म्हणाला, 'कावळे, दादा, तुझ्या गाण्याची खूप कीर्ति मी ऐकली आहे. म्हण ना एकादें गाणें. ऐकूं दे तरी एकदां.' तो भोळा कावळा या स्तुतीला फसला आणि गाण्यासाठीं त्यानें तोंड उघडलें. त्याबरोबर त्याच्या तोंडांतून मांसाचा तुकडा खालीं पडला. तो विजयाच्या आनंदानें चटकन् कोल्ह्यानें उचलला व तो चालूं लागला. पण चार पावलें तो गेला नाहीं तोंच काव् काव् असे आवाज त्याच्या कानांवर येऊं लागले व चोंचीचे तडाखे त्याच्या पाठीवर बसूं लागले. त्या भोळ्या कावळ्याचे जातभाई कोल्ह्यावर तुटून पडले होते. कोल्हा भयभीत झाला आणि तोंडांतला मांसाचा तुकडा तेथेंच टाकून खुशाल पळत सुटला. मग एका कावळ्यानें तो तुकडा उचलून झाडाच्या टोकावर हताश होऊन बसलेल्या त्या भोळ्या कावळ्याला नेऊन दिला."

नानांनीं तात्पर्य सांगण्याचें नाकारलें. कावळ्यांसारख्या प्राण्यांनीं संघटित होऊन एका धूर्त चोराच्या तोंडांतलें घबाड कसें परत मिळविलें याचें कौतुक करीत व यापासून काय बोध घ्यावा याचा विचार करीत सर्वजण घरोघर गेले.

★




आज सायंकाळीं नाना आले त्यावेळीं त्यांच्या हातांत ' भक्तिकुसुमें ' हें पुस्तक होतें. मुलांना वाटलें कीं यांतलीच एकादी गोष्ट आज सांगणार आहेत नाना. पण तो समज चुकीचा ठरला. कारण नानांनीं आल्यावरोवर पुस्तक बाजूला ठेऊन दिलें आणि गोष्ट सांगण्याचा पवित्रा घेऊन ते बसले. तेव्हां पुस्तक नानांनीं आणलें तरी कशाला असा प्रश्न मुलांच्या मनांत आलाच. अनवरमिया म्हणजे मोठे उतावळे गृहस्थ ! त्यांनीं लागलीच नानांना विचारलें, " नाना, आज ये किताब आप किस वास्ते लाये हैं ? " तेव्हां नाना हंसून म्हणाले, ' अनवर, शेवटीं समजेल बरं का ! '

आणि मग नाना सांगूं लागले.

" आज मी तुम्हाला जी गोष्ट सांगणार आहें ती कोकण प्रांतांतलीं आहे. रेल्वेच्या किंवा दळणवळणाच्या इतर मार्गांपासून एकादा भाग दूर असला म्हणजे तेथें मागासलेपणा राहतो. लोकभ्रम असतात. माणसं वर्तमानकाळांत न राहतां भूतकाळाचा विचार करीत बसतात. मी ज्या प्रदेशाची हकीकत सांगतों तेथें अशीच स्थिती होती.

" धर्मा आणि संभू हे दोन शेतकरी एका गांवांत रहात असत. त्यांचीं घरं जवळ जवळ होतीं. कारण गांवच केवढं होतं म्हणा !

शे-दीडशें घरांची वस्ती. धर्मा आणि संभू यांचीं शेतंहि जवळ जवळच होतीं.

" धर्मा गरीब शेतकरी होता. मोठा सालस आणि पापभीरु. कष्ट करून घाम गाळावा आणि खरी श्रमाची भाकरी खावी असें त्याचं जीवन होतं. उलट संभू परिस्थितीनें चांगला मातबर, मोठा माजोरी आसामी होता. लोकांच्या श्रमावर चैन करण्यांत त्याला कांहीं वाटत नसे. इतकेंच नव्हे, तर अशी चैन करण्याचा आपला हक्कच आहे असे त्याला वाटे. आणि आपल्यापेक्षां गरीब शेतकऱ्यांना धाकदपटशा वगैरे दाखवून तो पैसे, धान्य उकळी. आपण जणूं सर्वांचे धनी होण्यासाठींच जन्माला आलों आहों असे त्याला वाटे.

" धर्माला संभूचा फार जाच होत असे. पण धर्माचें सर्व काम चोख असल्यामुळें त्याला पेंचांत आणणं संभूला साधत नसे. मग त्या क्रूर माणसानें एक वेगळीच युक्ति केली. धर्माचा एकुलता एक मुलगा होता. संतू त्याचं नांव. धर्माचं त्याच्यावर प्राणापेक्षां अधिक प्रेम होतें. धर्माचीं अनेक मुलें गेलीं आणि अखेर संतू तेवढा जगला. त्यामुळं संतूला तो डोळ्यातील बाहुलीप्रमाणें जपत असे. संभूनें धर्माच्या मनाचा हा नाजूक कोपरा हेरून ठेवला होता. आणि त्याचा फायदा घ्यायचाअस त्यानें ठरविलं होतं.

" एके दिवशीं संभू धर्माकडे येऊन म्हणाला, ' माझ्या शेताची तूं मशागत करणें जरूर आहे. ' आपणांला पुष्कळ काम अगोदरच आहे असं धर्मानं सांगतांच संभू म्हणाला, ' तुला संतू पाहिजे असल्यास माझें ऐकलें पाहिजे. '

" म्हणजे ? " धर्मानें चमकून विचारलें.

" उद्यां अमावस्या आहे. माझ्या शेतापासून जरा दूर उभा राहून तूं मजा पहा म्हणजे सारा उलगडा होईल.

इतके बोलून आणि चमत्कारिक चेहरा करून संभू निघून गेला.

धर्माची पांचावर धारण बसली ! एवढा धैर्याचा माणूस तो, पण त्याला कांपरें भरलें ! काय आपल्या कपाळीं लिहिलें आहे कुणास ! ठाऊक मन घट्ट करून तो दुसरे दिवशीं रात्रीं संभूच्या शेतानजीक गेला. तो काय चमत्कार ? लांब लांब चकचकीत असे अग्निकण दिसत होते. भयभीत झालेला संभू धर्माला म्हणाला, " पाहिलंस. ही वेताळाची स्वारी येत आहे. त्यांच्याच या दिवट्या." इतक्यांत लांब कुंपणामागून एक आवाज आला, " संभू, धर्मा काय म्हणतो ? त्यानं तुझ्या शेतांत घाम गाळला नाहीं तर खाऊन टाकीन त्याच्या मुलाला सांग त्याला."

" संभू म्हणाला, ' धर्मा, पाहिलंस. देवाची अशी इच्छा आहे. मला तुझें फुकट श्रम का पाहिजेत ?' धर्मा कांहीं न बोलतां परतला. पण दुसरे दिवसापासून तो संभूच्या शेतावर पोट बांधून काम करूं लागला. करतो काय बिचारा ! देवतेच्या कोपाची भीति होती ना ?"

"धर्माचे दिवसोंदिवस नुकसान होऊं लागलें. त्याच्या आवडत्या संतूला गोकर्णभर दूध सुद्धां मिळायची पंचाईत पडूं लागली. एक दिवस गांवातल्या एका सज्जन मित्राला धर्मानं आपली सर्व हकीकत सांगितली. या मित्राचा मुलगा मुंबईहून विज्ञानशास्त्राचा पदवीधर होऊन आला होता. आपण बी. एस्. सी. म्हणतों ना तसा !"

त्यानं धर्माची हकीकत लक्षपूर्वक ऐकली आणि तो म्हणाला, ' हें पहा धर्माकाका, तुमच्या त्या संभूला म्हणावं आमच्या

मित्राच्या एका पोराला वेताळाचा चमत्कार पाहायचा आहे. तेव्हां येत्या अमावास्येला त्याला घेऊन येतों मी.'

धर्मानें त्याप्रमाणें केलें. संभूहि तयार झाला. अमावास्येच्या अगोदर हा पदवीधर तरुण सूक्ष्मपणें त्या शेताची पहाणी करून आला. नंतर अमावास्येला धर्माबरोबर तो तेथें गेला. संभूनें नेहमींचा आव आणून गंभीर वातावरण तयार करून ठेवलें होतें."

"'काय संभूराव! अजून वेताळ येत नाहींत?' तरुणानें विचारलें. 'येतील ना आतां.' 'मग मीच जातों सामोरा त्यांना' असें म्हणून अग्निकणाच्या दिशेनें तो तरुण चालू लागला तेव्हां, संभू ओरडून म्हणाला, 'अहो राव, हें काय करतां आहां! अहो धोका आहे पुढें.' तेव्हां हंसून त्या तरुणानें उत्तर दिलें, 'मला ठाऊक आहे धोका कुठें आहे तो.' आणि त्या अग्निकणांजवळ जाऊन त्यानं ते हातांतल्या काठीनं उडवून दिले. तोंच कुंपणाच्या आड दडलेलीं दोन माणसं पळालीं."

'मग तो तरुण धर्माला म्हणाला, धर्माकाका, पहा या संभूची लबाडी. वेताळ म्हणून कुणी बोलल्यासारखें वाटावें म्हणून हीं माणसें बसविलीं होतीं या संभ्यानें. आणि फास्फरसचे तुकडे तुम्हांला वेताळाच्या दिवट्यांसारखे वाटत. हवेंतला ऑक्सिजन वायू लागला कीं फास्फरस जळूं लागतो. अमावास्येच्या गडद अंधारांत तो जाळ स्वच्छ दिसतो. हा संभ्या तुमची पिळणूक करीत होता."

"संभू मनांत संतापला, चडफडला. पण करतो काय? लबाडीचें पुरेपुर माप त्याच्या पदरांत त्या पदवीधर तरुणानें घातलें होतें.

धर्माची वेठ बंद झाली. तो सुखानें संसार करूं लागला. "

एवढें सांगून नाना म्हणाले, " या गोष्टींत वादविवादासारखें कांहीं नाहीं. पण या गोष्टीला समर्पक नांव कोण सुचवील ? मला ज्याचें नांव सर्वांत अधिक पसंत पडेल त्याला ' भक्तिकुसुमें ' हें पुस्तक मी देणार आहे. "

थोडा विचार करून मुलें उत्साहानें मथळा सुचवूं लागलीं.

" **संभूची फजिती** " " अगदींच सामान्य नांव आहे. "

" **वेताळाची खोटी भीति** " " बरं. आणखी ? "

" **धर्माचा भ्रमनिरास** " " चालेल, पुढें ? "

" **धर्माचा जय** " " ठीक आहे. पण नुसती शाब्दिक कोटी. "

" **ज्ञान म्हणजेच अभय** " " अगदीं बरोबर. कुणीं सुचविलें हें ? "

" मी " शांता म्हणाली.

" शाबास शांता. तुला ' भक्तिकुसुमें ' हें पुस्तक बक्षीस देतों. बालमित्रांनो ! नेमकं हेंच मला या गोष्टींत सांगावयाचें आहें. मनुष्याची भीति ही अज्ञानावर आधारलेली असते. अज्ञान संपलें कीं भय गेलें· ज्ञान म्हणजे निर्भयता. "

शांताच्या हातांत नानांनीं पुस्तक दिलें तेव्हां सर्वांनीं टाळ्या वाजविल्या. शांतानें प्रणामपूर्वक पुस्तकाचा स्वीकार केला. पण तें पुस्तक परत तेथल्या तेथेंच आपल्या मित्रसंघाच्या ग्रंथालयास नजर केलें ! पुनः टाळ्यांचा कडकडाट झाला !

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# — गोड गोष्टींचा खजिना —

आपल्याजवळच्या संग्रहांत ही अमूल्य भर टाका.

◆ चंद्रशेखर व मोहना ◆

किं. ६ आणे : दुरंगी आकर्षक मुखपृष्ठ, सुबक छपाई, रम्यमधुर कथा

◆ साधुसंतांच्या गोष्टी ◆

किं. १२ आणे : तिरंगी आकर्षक मुखपृष्ठ : उद्‌बोधक पौराणिक कथा

◆ रामायणांतल्या सोप्या गोष्टी ◆

किं. १२ आणे : तिरंगी मुखपृष्ठ : यांतल्या गोष्टी म्हणजे नुसती मेवामिठाई

◆ साराच चमत्कार ◆

किं. ८ आणे : चन्द्रलोकावरच्या अद्‌भुतरम्य स्वारीचें मौजेचें

● सात राजहंस ●

किं. ८ आणे : रम्य परीकथा.

● टापटिपीचा संसार ●

किं. १॥ रु. : ताईच्या लग्नांत तिला भेट द्यायला अगदीं योग्य पुस्तक

आणि इतर कितीतरी मधुर कथांचीं पुस्तकें मागवा.

## —: आनंद कार्यालय .—

## ३३० सदाशिव पेठ, पुणें २.


प्रकाशक : प्रो. क. जोशी, आनंद कार्यालय, ३३० सदाशिव, पुणें २.

मुद्रक : प्रो. क. जोशी, [illegible] सदाशिव, पुणें २.



IRBK-0102618